महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

इबोला रूग्णांची तपासणी करणा-या डॉक्टरांच्या पथकाकडे शास्त्रीय वैद्यकीय साधने नसल्याबाबत

(१) ९२२३ (०७-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमानतळावर येणा-या संशयित इबोला रूग्णांची तपासणी करणा-या डॉक्टरांच्या पथकाकडे शास्त्रीय वैद्यकीय साधने नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इबोला हा रोगाचा प्रसार रोखण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, पुणे महानगरपालिकेच्या डॉ.नायडू संसर्गजन्य रूग्णालयातील इबोला रूग्णांवर उपचार करण्याकरिता स्थापन केलेल्या डॉक्टरांच्या पथकाला वैयक्तिक सुरक्षा कीट देण्यात आले आहे, हे खरे आहे काय

(४) केंद्र शासनाच्या आरोग्य खात्यातर्फे डॉक्टरांना पुरविण्यात आलेले वैयक्तिक सुरक्षा कीटचा दर्जा तपासणी विना डॉक्टरांना देण्यात आले आहेत ?

डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) इबोला आजार प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. राज्यातील सर्व विमानतळावर इबोला ग्रस्त देशातून येणाऱ्या प्रवाशांची आरोग्य विषयक तपासणी.

२. संशयित प्रवाशांचा ३० दिवसांकरिता पाठपुरावा.

३. संशयित रुग्ण भरती करण्यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे विलगीकरण कक्षाची स्थापना.

४. इबोला निदानाची राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथे मोफत सुविधा.

५. सर्व विलगीकरण कक्षास तसेच विमानतळावरील वैद्यकीय चमूस आवश्यक साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.

६. संशयित इबोला रुग्णांसाठी विशेष ५ रुग्णवाहिकांची सोय.
७. इबोला प्रतिबंध व नियंत्रण संदर्भात राज्यातील डॉक्टरांचे प्रशिक्षण
८. इबोला संदर्भात आरोग्य शिक्षण

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही. सर्व विलगीकरण कक्षात देण्यात आलेले वैयक्तिक सुरक्षा किट (पी.पी.ई.) हे केंद्र शासनामार्फत पुरविण्यात आले असून त्यांचा वापर स्वाईन फ्ल्यू उद्रेकाच्या वेळीदेखील प्रभावीपणे करण्यात आला आहे.

पुणे महानगरपालिकेत सन १९९७ ला समाविष्ठ झालेल्या २३ गावांपैकी २२ गावांचे जन्म-मृत्यू नोंदणीचे दप्तर १६ वर्षे उलटूनही मनपाकडे वर्ग न केल्याबाबत

(२) ९२४२ (०७-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत सन १९९७ ला समाविष्ठ झालेल्या २३ गावांपैकी २२ गावांचे जन्म-मृत्यू नोंदणीचे दप्तर १६ वर्षे उलटूनही मनपाकडे वर्ग झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सर्व सामान्य नागरीकांना तत्कालीन जन्म मृत्यूच्या नोंदी घेणेकरीता हेलपाटे मारावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू दप्तर मनपाकडे वर्ग न होण्याची सर्व साधारण कारणे काय आहेत, केव्हा पर्यन्त हे दप्तर मनपा कडे वर्ग करण्यात येईल ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :(१) अंशतः खरे आहे.

जन्मू-मृत्यू नोंदणी विभागाकडील सेवकांनी समक्ष जावून माहे ऑक्टोबर, २०१४ मध्येच समाविष्ट गावांकडील जन्म-मृत्यूचे रजिस्टर रेकॉर्ड आणले आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

जन्म-मृत्यू दाखले संबंधित संपर्क कार्यालयाकडून माहे ऑक्टोबर, २०१४ पर्यंत देण्यात येत होते.

माहे ऑक्टोबर, २०१४ मध्येच सर्व रजिस्टर रेकॉर्ड आणून संगणकीकरण करणेत आलेले आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालयात नागरीकांना दाखले त्वरीत उपलब्ध होत आहेत.

(३) माहे ऑक्टोबर, २०१४ पूर्वी रजिस्टर रेकॉर्ड संपर्क कार्यालयाकडे असल्याने पुर्ण महानगरपालिकेच्या क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत संपर्क कार्यालयाकडूनच जन्म-मृत्यूचे दाखले वितरीत करण्याचे काम सुरु होते.

२३ गावांकडील जन्म-मृत्यू नोंदणीचे सर्व दप्तर माहे ऑक्टोबर, २०१४ मध्येच संपर्क कार्यालयाकडे वर्ग करुन, सदरचे रजिस्टर रेकॉडचे संगणकीकरण करण्यात आले आहे.

गोंदीया सिचन विभागाअन्तर्गत असलेले चोरखमारा, बोदलकसा, खरबदा, रिसाठा तलावाच्या नुतनीकरणाच्या अपूर्ण कामाबाबत

(३) ९२५९ (०७-०४-२०१५). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नुतनीकरणाच्या कामाला शासनाने निधी देणे बंद केले आहे काय व निधी किती वर्षापासून मिळालेला नाही,

(२) असल्यास, नुतनीकरणाचे कामे केंव्हापर्यंत पुर्ण होणार व लागणारा निधी शासन देणार आहे काय,

(३) असल्यास, कामे पूर्ण होण्याकरिता व वितरण व्यवस्था सुव्यवस्थीत करण्याकरीता संबंधित विभाग कोणती उपाययोजना करीत आहे,

(४) असल्यास, सिंचनाच्या दृष्टीने शासन प्रलंबित असलेली देयके देणार का व उर्वरित कार्य व नविन कामे करण्याकरिता विभागाच्या वतीने निधीची मागणी व प्रस्ताव शासनास सादर केले आहेत काय,

(५) तसेच, शेतक-यांच्या हितार्थ शासन प्रस्तावास मंजुरी प्रदान करुन निधी देणार आहे की नाही ?

श्री. गिरीष महाजन (०१-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.

सर्व प्रकल्पांच्या नुतनीकरणाच्या कामांना प्रशाकीय मान्यतेच्या मर्यादेत शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला आहे. खैरबंधा मध्यम प्रकल्प व रिसाळा लघु प्रकल्पाच्या नुतनीकरणच्या कामांना निधी वितरीत करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) चोरखमारा व बोदलकसा या दोन्ही मध्यम प्रकल्पांच्या नुतनीकरणची कामे ८० टक्के पूर्ण झाली आहेत. तसेच खैरबंधा मध्यम प्रकल्प व रिसाळा लघु प्रकल्पाची नुतनीकरणाची कामे पूर्ण झालेली आहेत. सदर कामे सु.प्र.मा. च्या किंमतीच्या मर्यादेत यथास्थितीत अंतिम करुन प्रकल्पांचे पूर्णत्व अहवाल सादर करावे व उर्वरित कामांसाठी नव्याने विशेष दुरुस्तीचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) नियोजीत महाराष्ट्र सिंचन सुधारणा विशेष कार्यक्रमांतर्गत मंजुरीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तिवसा (जि. अमरावती) तालुक्यातील वरखेड गावात कोल्हापूर बंधारा निर्माण करण्यात येऊन परिसरातील सिंचन सुविधा मजबुत करण्याबाबत

(४) ९२७६ (०७-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि. अमरावती) तालुक्यातील वरखेड गावात कोल्हापूर बंधारा निर्माण करण्यात येऊन परिसरातील सिंचन सुविधा मजबुत करण्यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी कोल्हापूरी बंधारा त्वरीत मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम सविस्तर प्रकल्प अहवाल ४ मध्ये कोल्हापूरी बंधारा वरखेड तालुका तिवसा समाविष्ट करण्यात आला आहे.

(३) केंद्र शासनाकडून निधीच्या उपलब्धतेच्या अनुषंगाने मंजुरीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

नांदगाव पेठ (जि.अमरावती) येथील उकळी या गावात रामदास मेश्राम यांच्या विहीरीच्या बांधकामासाठी अनुदानाची केलेली मागणी

(५) ९२८४ (०७-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव पेठ जि.अमरावती येथील उकळी या गावात रामदास मेश्राम हे पायाने अपंग असून अतिवृष्टीमुळे त्यांच्या खचलेल्या विहीरीच्या बांधकामासाठी अनुदानाची वारंवार मागणी करण्यात येवूनही त्यांच्या मागणीकडे संबंधित विभाग दुर्लक्ष करीत असल्याने त्यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अपंग शेतक-याला खचलेल्या विहीरीचे बांधकामासाठी त्वरीत अनुदान देण्याबाबत तसेच सदरहू शेतक-यास अनुदान देण्यात दुर्लक्ष करणा-या विभागावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (३०-०४-२०१५) :(१) व (२) हे खरे नाही.

तथापि, रामदास मेश्राम यांनी खचलेल्या विहिरीच्या दुरुस्तीची मागणी केलेली असून सदर कामास तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच सदर लाभार्थ्यांच्या विहिर दुरुस्तीचे काम लवकरात लवकर सुरु करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील तिवसाघाट फिडर १५ दिवसापासून बंद असल्याबाबत

(६) ९२८९ (०७-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील तिवसा घाट येथील रोहित्र गेल्या ६ महिन्यांपासून अडीच फेजवर असून या रोहित्रावरील शेतक-यांच्या मोटारी जळाल्या असून तिवसाघाट फिडर १५ दिवसापासून बंद असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शेतक-यांच्या रब्बीचा गहू व हरभ-याच्या पिकांवर परिणाम होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हयातील वसतीगृहात कार्यरत महिला गृहपाल कायमस्वरुपी नसल्याबाबत

(७) ९२९२ (१०-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील संत कंवरराम चौक येथील वसतीगृहात २० वर्षीय विद्यार्थीनीची एका मुलीला जन्म दिला असून त्या विद्यार्थीनी व तिच्या नवाजात बालिकेकडे गृहपालांनी दुर्लक्ष केल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतीगृहात कार्यरत महिला गृहपाल प्रतिनियुक्तीवर असून एकही गृहपाल कायमस्वरुपी नसल्याने अशा प्रकरणी दुर्लक्ष होत असल्याने कायमस्वरुपी गृहपाल देण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०६-०६-२०१५) :(१) अंशत: खरे आहे.

अमरावती शहरातील, कंवरनगर भागातील आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह क्र.३ येथे प्रवेशित असलेली एक विद्यर्थीनी दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे प्रसुत झाली आहे, ही बाब खरी आहे. परंतु सदर विद्यार्थीनीला शारिरिक त्रास होत असल्याने महिला गृहपालांनी तात्काळ या विद्यार्थीनीला रुग्णालयात दाखल केले. तसेच विद्यार्थीनीच्या प्रसुतीदरम्यान तिच्यासोबत वसतीगृहाच्या गृहपाल रुग्णालयात हजर होत्या. त्यामुळे गृहपाल यांनी विद्यार्थीनीच्या प्रसुतीवेळी तिची काळजी घेतली नाही व दुर्लक्ष केले, ही बाब खरी नाही.

(२), (३) व (४) अमरावती येथे आदिवासी मुलींसाठी ५०० प्रवेश क्षमतेचे शासकीय वसतीगृह मंजुर आहे. सदरहू वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी गृहप्रमुख-१, गृहपाल-२ व इतर ९ कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी गृहपालाची २ पदे व इतर सहायक कर्मचाऱ्याची पदे भरलेली आहेत. गृहप्रमुख या पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य गृहपालांकडे सोपविण्यात आला आहे.

सदरचे वसतीगृह हे मोठया क्षमतेचे असल्याने सदरहू वसतीगृहास एकत्रित स्वरुपात खाजगी इमारत न मिळाल्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून ३ ठिकाणी खाजगी इमारतीमध्ये मुलींची निवास व्यवस्था करण्यात आली आहे. सबब, सदर ३ इमारतींमधील वसतींगृहांसाठी नियमित २ व प्रतिनियुक्तीने २ अशा एकूण ४ गृहपालांची नियुक्ती केलेली आहे. सदरच्या ३ इमारतीपैकी कंवरनगर या भागातील इमारतीमधील १०० मुलींचे व्यवस्थानसाठी प्रभारी गृहपालाची जबाबदारी जिल्हयातील शासकीय आश्रमशाळेतील स्त्री-अधिक्षीका श्रीमती व्ही.डी.उज्जैनकर यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे. नयिमित व प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या गृहपाल व इतर सहायक कर्मचाऱ्यांद्वारे मुलींच्या वसतीगृहाचे दैनंदिन कामकाज केले जात असल्याने वसतीगृह प्रशासनाकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे नाही.

फलगांव ग्रामपंचायतीमधील (ता.नांदगांव खडेश्वर, जि.अमरावती) स्मशानभूमीच्या रस्त्याबाबत

(८) ९३०० (०७-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील नांदगांव खंडेश्वर तालुक्यातील फलगांव ग्रामपंचायतीमध्ये सन २०१२-१३ मध्ये जनसुविधाअंतर्गत गावात स्मशानभूमीकरिता रस्त्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या ५ लाखाचा निधी पंचायत समितीअंतर्गत थेट ग्रामपंचायत खात्यात जमा करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सध्याचे सरपंच यांनी या प्रकरणी चौकशी करणा-या अधिका-यांना कोणतीच माहिती नसल्याचे नमूद केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये उघड झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी अफरातफर झाल्याने याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) अद्याप, या प्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :(१) हे खरे नाही. सदर निधी रेखांकीत धनादेशाद्वारे सचिव/सरपंच ग्रा.पं. फलगांव (फुबगाव) यांना वितरीत करण्यात आला आहे.
(२) होय हे खरे आहे. तत्कालीन ग्रामसेवकांनी जनसुविधेचा प्रभार न दिल्यामुळे विद्यमान कंत्राटी ग्रामसेवक व सरपंच यांनी या विषयी काहीच माहिती नसल्याचे
दि. ४.१२.२०१४ रोजी संयुक्त सहीनीशी लेखी बयान सादर केले आहे.
(३) हे खरे नाही, त्या प्रकरणी अफरातफर झालेली नाही. तथापि, तत्कालीन ग्रामसेवकाने विद्यमान कंत्राटी ग्रामसेवक यांना सदर योजनेचा प्रभार न दिल्यामुळे त्यांचेविरुध्द खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) तत्कालीन ग्रामसेवक, ग्रा.पं. फलगांव (फुबगाव) यांचे विरुध्द खाते चौकशी प्रस्तावित करणेबाबत जिल्हास्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

जगतपूर (ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील विहीरीच्या बांधकामाबाबत

(९) ९३०५ (०७-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जगतपूर (ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील विहीरीच्या बांधकामासाठी तक्रारीमध्ये चौकशी अंती सत्यता आढळूनही याबाबत अद्यापी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी यांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (११-०६-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२) याबाबत प्रकल्प स्तरावर चौकशी झालेली असून अहवालामध्ये विसंगती आढळून येत असल्याने या प्रकरणी आयुक्त, आदिवासी विकास यांना सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

करवीर तालुक्यातील (जि.कोल्हापूर) वडकशिवाले येथे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामातील गैरव्यवहाराबाबत

(१०) ९३११ (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवीर तालुक्यातील (जि.कोल्हापूर) वडकशिवाले येथे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या वडकशिवाले ते इस्पुर्ली तसेच नदी पाणवठा रस्त्याचे ३५ लाखाचे काम प्रत्यक्षात पाच लाखांत केल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास केलेल्या चौकशीत आढळून आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चौकशीत आणखी कोणत्या त्रुट्या आढळून आल्या आहेत,

(३) असल्यास, यासंदर्भात दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील रिक्षा युनियनच्या वतीने केलेल्या तक्रारीचे कारण पुढे करुन प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कागल-रंकाळा व हुपरी-रंकाळा एस.टी. बससेवेचे थांबे (स्टॉप) बंद केल्याबाबत

(११) ९३१३ (०४-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील रिक्षा युनियनच्यावतीने केलेल्या तक्रारीचे कारण पुढे करुन प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कागल-रंकाळा व हुपरी-रंकाळा एस.टी या बससेवेचे शहरातील थांबे (स्टॉप) बंद करण्याचे आदेश राज्य परिवहन महामंडळास माहे डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार विद्यार्थी व नोकरदारांना याचा फटका बसणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१५) :(१) व (२) हे खरे आहे.

(३) दिनांक १०.१२.२०१४ रोजी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या समवेत झालेल्या बैठकीमध्ये शहरांतर्गत वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी दि.०१.१.२०१५ पसून रा.प.बसेसच्या मार्गामध्ये बदल करण्याचे आदेश दिले. तथापी, प्रवाशांची होणारी गैरसोय पाहून जिल्हाधिकारी यांनी दि.१९.०१.२०१५ रोजी सदरचा आदेश रद्द केला, सद्यस्थितीत रंकाळा येथे प्रवाशांची चढ-उतार केली जाते व प्रवाशांची कोणतीही गैरसोय होत नाही. दि.२०.१.२०१५ पासून वरील मार्गावर वाहतूक पुर्ववत सुरु करण्यात आली आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी दरवेशींना दिलेल्या जमीनी काढून घेतल्याने त्यांना कुटुंबाचा चारितार्थ चालविणे कठीण होत असल्याबाबत

(१२) ९३१५ (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजर्षी शाहू महाराजांनी दरवेशींना उदरनिर्वाहासाठी दिलेल्या जमिनी कुळ कायद्याने काढून घेतल्यानंतर प्राणीबंदी कायद्याच्या नावाखाली दरवेशी समाजाकडून त्यांची अस्वलेही काढून घेतल्याने दरवेशींना कुटूंबाचा चारितार्थ चालविणे कठीण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात जिल्हाधिकारी व संबंधित अधिका-यांकडे निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दरवेशी समाजाच्या उदरनिर्वाहाकरिता तसेच पुनर्वसनासंदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अन्वये वन्यप्राणी बाळगणे, प्रदर्शित करणे हा गुन्हा असल्याने सन २००७ मध्ये कोल्हापूर वन विभागामध्ये गुन्हा नोंदवून दोन अस्वले जप्त करण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा व अभयारण्याकरिता आपली जमिन देऊनही या प्रकल्पग्रस्तांनी स्मशानभूमिकरिता तसेच विविध मागण्यांसाठी केलेले आंदोलन

(१३) ९३२० (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी वारणा अभयारण्याकरिता आपली जमिन देऊनही या प्रकल्पग्रस्तांना स्मशानभूमिकरिता तसेच आपल्या विविध मागण्यांसाठी माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्याच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिया आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्त गेल्या २५ वर्षांपासून आपल्या न्याय मागण्यासंदर्भात वेळोवेळी पुणे विभागीय कार्यालय, जिल्हा प्रशासन व मंत्रालयात निवेदने व आंदोलने करुन कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांच्या स्मशानभूमिसह विविध मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०६-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन उपलब्ध करुन देण्याची तसेच पुनर्वसन वसाहतीमध्ये स्मशानभूमीसह इतर नागरी सुविधा पुरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

कोल्हापूर जिल्हयात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने साडेतीन किलो सोने जप्त केल्याबाबत

(१४) ९३२६ (०६-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने चार गुन्हेगारांनी सराफी व्यापा-यांना विकलेले तब्बल साडेतीन किलो सोने माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास जप्त केले असे असतांनाही या सराफी व्यापा-यांवर पोलिसांनी अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,
(२) परंतु, दि. २५.१२.२०१४ रोजी एका महिला गुन्हेगारांकडून चार ग्रॅम सोने विकत घेणा-या संजय नावाच्या सामान्य चांदी कारगिरावर गुन्हा दाखल करुन त्याला मारहाण करण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त सराफी व्यापा-यांवर कारवाई केली असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :(१) प्रश्नात नमूद प्रकरणी कोल्हापूर जिल्हा पोलीसात गुन्हा दाखल नाही.
(२) व (३) कोल्हापूर शहरातील सराफी दुकानामधुन दि.९/६/२०१४ रोजी ७ आरोपीनी रु.१, ८९०००/- किंमतीचे सोन्याचे दागीने चोरले व सदर मुद्देमाल प्रश्नात नमूद सराफ व्यापारी यांना विकल्याचे निष्पन्न झाल्याने ७ आरोपींना अटक करण्यात आली. सदर व्यापा-याला कोणत्याही प्रकारची मारहाण करण्यात आलेली नाही.

उक्त ८ आरोपी पैकी चोरी करणा-या ७ आरोपींना न्यायालयाने न्यायालयीन कोठडीत ठेवले असून आरोपी व्यापा-यास जामीनावर मुक्तता केली आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

साळशी (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील रोजगार हमी योजनेत झालेल्या अपहाराप्रकरणी शाखा अभियंता क्षीरसागर यांच्यावरील गुन्हयाबाबत

(१५) ९३२८ (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साळशी (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील रोजगार हमी योजनेत झालेल्या अपहाराप्रकरणी शाखा अभियंता क्षीरसागर यांच्यावर माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास फौजदारी गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१५) :(१) होय.

(२) या प्रकरणी दोषी आढळलेले संबंधित शाखा अभियंता, पंचायत समिती, शाहूवाडी यांच्या विरुध्द भा.द.वि.स. कलम ४०६, ४०८, ४२०, ४६५, ४६७, ४६८, नुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिनांक २८.०४.२०१४ च्या पत्रान्वये त्यांना निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव, दोषारोपासह सार्वजनिक बांधकम विभाग, मंत्रालय यांचेकडे सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

माखजन (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायतीमध्ये अपहार झाल्याबाबत

(१६) ९३७० (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माखजन (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायतीमध्ये २०११-१२ व २०१२-१३ या आर्थिक वर्षात ग्रामनिधीचा तब्बल ३६ लाख ६९ रुपयांचा अपहार झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार याप्रकरणी दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०२-०७-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.
(२) याप्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमेश्वर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीत सन २०११-१२ ते २०१२-१३ या कालावधीत ग्रामनिधीतून रक्कम रु.३२,८५,११४/-, १२ व १३ वा वित्त आयोगामधून झालेल्या खर्चामध्ये एकूण रक्कम रु.३,८४,३१७/- असा एकूण रु.३६,६९,४३१/- चा अपहार झालेला आहे.
(३) सदर अपहारास जबाबदार असलेले तत्कालीन ग्रामसेवक श्री.जे.एस.मांगले यांना दिनांक १७.०१.२०१५ अन्वये सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच सरपंच व ग्रामसेवक यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमेश्वर यांना देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) राजापूर-भांबेड, लांजा आणि देवरूख-संगमेश्वर या मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांची झालेली दुरावस्था

(१७) ९३७५ (०९-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) राजापूर-भांबेड, लांजा आणि देवरूख-संगमेश्वर या मुख्य रस्त्यांना जोडणा-या या रस्त्यावर गेल्या अनेक वर्षांपासून खड्डयांचे साम्राज्य निर्माण झाले असून या रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून या मार्गावरून प्रवास करणे त्रासदायक होत असून त्यामुळे परिसरातील शालेय विद्यार्थी, प्रवासी व ग्रामस्थांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०६-०६-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्नाधीन रस्ते वाहतूकीस सुस्थितीत ठेवणेसाठी वेळोवेळी डांबरी पृष्ठभागावरील खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरणेत आले असून सद्यःस्थितीतीत रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

सदर रस्त्यांच्या डांबरी नुतनीकरणाची कामे मंजूरी निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्तीसाठी शासनाकडून आलेला निधी अपूरा पडत असल्याबाबत

(१८) ९३७७ (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्तीसाठी शासनाकडून आलेला निधी अपूरा पडत असल्यामुळे तब्बल ८१३ शाळा दुरुस्तीच्या प्रतिक्षेत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हापरिषदेच्या शिक्षण विभागाने जिल्हा नियोजन आणि विकास मंडळाकडे २ कोटीची मागणी केली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार उक्त शाळांच्या दुरुस्तीसंदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत गट शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत सदर शाळांची पाहणी करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या ८१३ वर्ग खोल्यांची छप्पर दुरुस्ती, दरवाजे, खिडक्या, लादी बसविणे अशा प्रकारची दुरुस्ती आवश्यक असल्याचे आढळून आले आहे.

(४) सदर शाळांची दुरुस्ती निधी उपलब्धतेनुसार करण्यात येत आहे. सन २०१४-१५ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ६०.०० लाख मंजूर अनुदानातून ३६ शाळा दुरुस्तीची कामे सुरु आहे. तसेच ४% सादील या योजनेंतर्गत ३२.०० लाखा निधी वितरण करण्यात आले असून त्यातून १४ शाळा दुरुस्तीची कामे सुरु आहेत. याशिवाय जिल्हा परिषद सेस अनुदानातून ३९.०० लाख निधी वितरित करण्यात आला असून त्यातून ३८ शाळा दुरुस्तीची कामे सुरु आहेत. एकूण ८१३ पैकी ८८ वर्ग खोल्यांची कामे पुर्ण होणार असून उर्वरित ७२५ वर्ग खोल्यांसाठी जिल्हा वार्षिक योजनेमधून १४५०.०० लाख अनुदानाची तसेच जिल्हा नियोजन समितीकडून १६००.०० अनुदानाची मागणी करण्यात आली आहे. तातडीने दुरुस्ती आवश्यक असलेल्या वर्ग खोल्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे व उर्वरित वर्ग खोल्यांची दुरुस्ती प्राधान्याने करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) लांजा, वाडगांव, गोविळ, मार्गाची दुरावस्था झाली असल्याबाबत

(१९) ९३७८ (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) लांजा, वाडगांव, गोविळ, मार्गाची दुरावस्था झाली असून वाहनचालकांसह प्रवाशांना ये-जा करणे अत्यंत गैरसोयीचे होत असल्याचे नुकतेच माहे जाने, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) तदनुसार उक्त मार्गाच्या नुतनीकरण्यासंदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्यामार्फत पहाणी करण्यात आली असून रस्ता खराब असल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) प्रश्नांकित रस्त्यावर खड्डे भरण्याचे काम मंजूर करुन एस.टी. वाहतूक सुरु करण्यात आली आहे. तसेच पुरहानी कार्यक्रमाअंतर्गत मोरी दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

कोकण वैधानिक विकास महामंडळाबरोबरच राज्य शासनाने रखडलेले सिंचन प्रकल्प तातडीने पुर्ण करून देण्याबाबत

(२०) ९३७९ (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या वतीने कोकणपट्टयात जवळपास लहानमोठे ७० सिंचन प्रकल्पाचे सुरू असलेले काम गेले ३० वर्षे कुर्मगतीने सुरू असल्याचे नुकतेच माहे जानेवारी २०१५ मध्ये निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणच्या विकासाचा बॅकलॉग भरून काढायचा असेल तर कोकण वैधानिक विकास महामंडळाबरोबरच राज्य शासनाने रखडलेले सिंचन प्रकल्प तातडीने पुर्ण करून त्याव्दारे शेतकऱ्यांना सधन करण्यासाठी सुयोग्य पावले उचलावीत अशी मागणी कुणबी सेनेचे प्रांतिक सदस्य यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१५) :(१) हे अंशत: खरे आहे. या विभागांतर्गत ४ मोठे, ११ मध्यम व ४८ लघु पाटबंधारे प्रकल्पांची कामे सुरु आहेत.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेला नदीपात्रातील सिंहगड रस्त्यांसाठी मा.सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याबाबत

(२१) ९३९३ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेला नदीपात्रातील रस्त्यांसाठी मा.सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ पर्यंतची मुदत देण्याचा निर्णय राष्ट्रीय हरित लवादाने (नॅशनल ग्रीन ट्रीब्युनल) दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लवादाच्या निर्णयाच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेने आतापर्यंत काय निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सिंहगड रस्त्याला पर्यायी रस्ता करण्यासाठी वा रुंदीकरणाच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) होय.
(२) विठ्ठलवाडी ते वारजे ह्या नदीकाठच्या रस्त्याचे ब्लु लाईनमध्ये येणारे बांधकाम काढून टाकणेबाबत मा.राष्ट्रीय हरित लवादाने दिनांक १४.१.२०१५ रोजी अंतिम निर्णय दिला आहे. मा.राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्णयाविरुध्द पुणे महानगरपालिकेतर्फे मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले होते. सदरच्या अपील दिनांक १२.२.२०१५ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले असुन, मा.राष्ट्रीय हरित लवादाचा निर्णय कायम केला आहे व रस्त्याचे ब्लु लाईनमध्ये येणारे बांधकाम ६ महिन्यात काढून टाकण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार दिनांक २७.३.२०१५, दिनांक २९.४.२०१५ व दिनांक १५.५.२०१५ रोजी प्रत्यक्ष कार्यवाही सुरु करण्यात आली. मात्र, नागरिकांच्या विरोधामुळे कार्यवाही करता आलेली नाही. त्याकरिता पुणे महानगरपालिकेने दिनांक १३.४.२०१५ च्या पत्रान्वये पुणे पोलिसांना बंदोबस्तातील कारवाईसाठी पत्रव्यवहार केला आहे व त्यानुसार महानगरपालिकेतर्फे पुढील कारवाई करण्यात येत आहे.
(३) सिंहगड रस्त्याला पर्यायी रस्ता म्हणून वडगाव बुद्रुक ते पु.ल.देशपांडे उद्यान पर्वती पर्यंतच्या कॅनॉल रस्त्याचे काम केल्यास सिंहगड रस्त्यावरील वाहतुक कोंडी काही प्रमाणात अंशत: कमी होण्यास मदत होईल. मान्य विकास आराखड्यानुसार या रस्त्याची रुंदी ७.५ मी. व लांबी ४,५०० मी. आहे. या रस्त्याच्या कामासाठी सन २०१५-१६ चे महानगरपालिका अंदाजपत्रकामध्ये रुपये ८८.९२ लक्ष तरतूद उपलब्ध असून संपूर्ण कामासाठी रुपये १९.८० कोटी खर्च येणार आहे. सदर रस्त्याचे काम चालू आर्थिक वर्षात प्रस्तावित आहे.

मुंबई आणि कोलकाता या अनुक्रमे समुद्र आणि नदी किनारी वसलेल्या घनदाट लोकवस्तीच्या महानगराला हवामान बदलाचा सर्वाधिक धोका असण्याची शक्यता

(२२) ९३९८ (०६-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि कोलकाता या अनुक्रमे समुद्र आणि नदी किनारी वसलेल्या घनदाट लोकवस्तीच्या महानगराला हवामान बदलाचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता असून या शतकाच्या अखेरीस पुरामुळे मोठया प्रमाणात जीवित व वित्त हानी होण्याची भीती या महानगराला अधिक असल्याचा इशारा संयुक्त राष्ट्राच्या अहवालाचा हवाला देत केंद्र शासनाने राज्य शासनास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगराला दिलेला सतर्कतेचा इशारा समजून शासनाने याबाबत कोणत्या उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (३०-०६-२०१५) :(१) केंद्र शासनाने अशा सुचना राज्यास दिल्या हे खरे नाही. तथापि, वातावरणीय बदलासंदर्भात संयुक्त राष्ट्राने प्रकाशित केलेल्या माहितीनुसार समुद्राची पातळी वाढणार असल्याची शक्यता वर्तविली आहे.

(२) मुंबई महानगरपालिमार्फत सखल भागात होणाऱ्या पुरसदृश्य परिस्थितीवर नियंत्रण करण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

धरणगांव (जि.जळगांव) येथे जलशुध्दीकरण केंद्र उभारण्याबाबत

(२३) ९४१४ (०६-०४-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणगांव (जि.जळगांव) येथे अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, गत अनेक वर्षे संबधित अधिका-यांकडे वारंवार तक्रारी करुनही अद्याप जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी केली गेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नगरपालिका धरणगांव, जि.जळगांव यांनी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग) नाशिक यांचेकडून जलशुध्दीकरण व वितरण वाहिन्या कामाचे अंदाजपत्रक ४ कोटी १९ लक्ष ७४ हजाराचे तयार करुन त्यास न.पा. ठराव क्र.४०७ दिनांक २८ मार्च, २०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना मान्यतेसाठी नपा ने जा.क्र./पा.पु./४९ दिनाक ६ जून, २०१३ अन्वये प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडे मंजूरीसाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०८-०७-२०१५) :(१) जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी केली नाही, हे खरे आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) धरणगाव नगर परिषद पाणी पुरवठा योजनेचा रु.४१९.७३ लक्ष किंमतीचा भांडवली कामांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता. धरणगाव नगर परिषदेच्या रु.७३.२९ लक्ष किंमतीच्या सुधारणा कामांना दि. १७.४.२०१३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाच्या धोरणानुसार पाणी पुरवठा योजनेतील सुधारणा कामे प्रथम पूर्ण केल्यानंतर त्याआधारे तयार होणा-या प्रकल्प प्रस्तावाच्या आधारे भांडवली कामांचा प्रस्ताव विचारात घेण्याचे शासनाने धोरण आहे. त्यामुळे धरणगाव नगर परिषदेच्या रु. ४१९.७३ लक्ष किंमतीच्या भांडवली कामांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली नाही. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानास दि. ३१ मार्च, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्याचा व त्यानंतर सदर अभियानांतर्गत नवीन कामांना मंजूरी न देण्याचा निर्णय, शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २०१४ अन्वये घेण्यात आला आहे. त्यामुळे धरणगाव नगर परिषदेची प्रस्तावित योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत घेण्याचे प्रस्तावित आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सेवानिवृत्तांच्या अडचणीबाबत

(२४) ९४१७ (०७-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील सेवानिवृत्तांच्या अडचणी बाबत जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी कल्याण समिती म. बुलढाणा जिल्हा यांनी दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद बुलढाणा यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) बुलढाणा जिल्ह्यातील सेवानिवृत्तांच्या अडचणी बाबत ठोस उपाययोजना करणे बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :(१) होय,

(२) व (३) बुलढाणा जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त कल्याण समितीने दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे निवेदन दिले आहे. त्या निवेदनातील बाबी जिल्हा परिषदेमधील वेगवेगळ्या खात्याशी संबंधित आहेत जिल्हा परिषदेच्या संबंधित खात्यामार्फत योग्य ती कार्यवाही सुरु आहे.

बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेत अंगणवाडी बांधकामांचा निधी प्रलंबित असल्याबाबत

(२५) ९४१८ (०७-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी बांधकामाचे १५ कोटी रूपये बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेत प्रलंबित असल्यामुळे सन २०१४-१५ या वर्षात जिल्हा नियोजन समितीने १३२ अंगणवाडी केंद्रांना प्रशासकीय मंजुरात देऊनही अंगणवाडी केंद्र बांधकामा विना आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी केंद्रांचा बांधकामांचा निधी त्यांना देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (१६-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

सन २०१४-१५ या वर्षामध्ये जिल्हा नियोजन समिती बुलढाणा यांचेकडून अंगणवाडी बांधकामाकरीता रु. ८.०० कोटी निधी मंजूर करण्यात आला असून सदर निधीमधून १३२ अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामास जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या दिनांक ०४.१०.२०१४ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर निधी पंचायत समिती स्तरावर वितरीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार उपरोक्त नमूद १३२ कामे e-tendering ची प्रक्रिया पूर्ण करुन सुरु करण्यात आलेली आहेत. त्यापैकी ७ कामे पूर्ण झालेली असून इतर कामे प्रगती पथावर आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रभावी अमलबजावणी साठी जिल्हा परिषदेकडील पाच कनिष्ठ शाखा अभियंता यांना प्रतिनियुक्तीत घेण्याबाबत

(२६) ९४२७ (०७-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेची प्रभावी अमलबजावणी साठी जिल्हा परिषदेकडील पाच कनिष्ठ शाखा अभियंता यांना प्रतिनियुक्तीत घेण्याबाबत ग्रामविकास विभागाने शासन निर्णय काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय होऊनही त्यावर मागील अडीच वर्षापासून काहीही कारवाई झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय व असल्यास चौकशीत का निष्पन्न झाले,

(४) असल्यास, उपरोक्त कामात दिरंगाई करणा-या अधिकारी व कर्मचा-यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेतंर्गत प्रत्येक जिल्ह्यात कनिष्ठ अभियंत्यांची १३ पदे निर्माण करण्यात आली आहेत. नियमित कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता यांच्या वेतन श्रेणीमध्ये फरक (रु.१००/- ग्रेड पे चा फरक) आहे. त्यामुळे नियमित शाखा अभियंत्यांना तुलनेने कनिष्ठ असलेल्या कनिष्ठ अभियंता पदावर प्रतिनियुक्ती देण्यास तांत्रिक अडचण उद्भवते. जिल्हा परिषदेकडील ५ अनुभवी शाखा अभियंत्यांना प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतंर्गत प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

राज्यातील क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(२७) ९४३२ (०९-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक तालुका क्रीडा संकुलात स्वतंत्र अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यात आलेली असतानाही राज्यातील उक्त अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत तसेच बुलढाणा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाअंतर्गत येणा-या १३ तालुक्यांमध्ये मेहकर तालुका वगळता इतर १२ तालुका क्रीडा अधिकारी यांची पदे रिक्त असून सदर पदे रिक्त असल्याने जिल्ह्यातील शालेय खेळाडूंची गैरसोय होत असल्याचे, आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यात क्रीडा अधिकारी व इतर पदे रिक्त असल्याचे तसेच वाशिम जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयात क्रीडा अधिकारी व वरिष्ठ लिपीक व शिपाई यांची पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त जिल्ह्यातील सदरील रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०९-०७-२०१५) :(१), (२) व (३) राज्यातील प्रत्येक तालुक्यासाठी तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची स्वतंत्र पदे निर्माण करण्यात आली आहेत, हे खरे नाही. सन १९९६ च्या क्रीडा धोरणानुसार प्रायोगिक तत्त्वावर राज्यातील ३१ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे ३१ तालुका क्रीडा संकुलास मान्यता देण्यात आली असून त्याअनुषंगाने तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची ३१ पदे निर्माण करण्यात आली आहे. सदर ३१ पदांपैकी सद्य:स्थितीत १० पदे रिक्त असून ती पदे सरळसेवा/पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

याशिवाय राज्याच्या सन २०१२ च्या क्रीडा धोरणानुसार तालुका क्रिडा अधिकाऱ्यांची ६९ नवीन पदे निर्माण करण्यास शासनाने मंजूरी दिली असून सदर पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

आर्णी (जि.यवतमाळ) साठी तालुका क्रीडा अधिकाऱ्यांचे पद मंजूर नाही.

नवनिर्मीत वाशिम जिल्ह्यासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी, वरिष्ठ लिपिक व शिपाई या संवर्गातील प्रत्येकी एक पद मंजूर असून सदर तिन्ही पदे सद्य:स्थितीत भरलेली आहे.

रमाई आवास घरकुल योजनेअंतर्गत मिळणारा निधी लाभार्थ्यांना न मिळाल्याबाबत

(२८) ९४३६ (०९-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जातीच्या लोकांचे राहणीमान उंचाविण्यासाठी त्यांना घरे बांधण्यासाठी शासनाकडून रमाई आवास घरकुल योजनेंतर्गत निधी देण्यात येत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेनुसार शासनाकडून ठाणे जिल्हा परिषदेकडे सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ तसेच सन २०१४-२०१५ या वर्षासाठी एकूण किती निधी प्राप्त झाला आहे तसेच सदरहू प्राप्त झालेल्या निधीतून एकूण किती लाभार्थ्यांना घरकुले देण्यात आली आहेत,

(३) असल्यास, सन २०१३-२०१४ तसेच २०१४-२०१५ या २ वर्षात ठाणे जिल्हा परिषदेला रमाई आवास योजनेंसाठीचा निधीच प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :(१) होय. अनुसूचित जातीच्या लोकांना घरे बांधण्यासाठी रमाई आवास योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभागाकडून निधी देण्यात येतो.

(२) रमाई आवास योजनेकरीता ठाणे जिल्हा परिषदेकडे

सन २०१२-१३ मध्ये रु.२२७.९५ लक्ष

सन २०१३-१४ मध्ये रु.३५.०० लक्ष

सन २०१४-१५ मध्ये रु.३.०० लक्ष

असा एकूण रु. २६५.९५ लक्ष निधी प्राप्त झाला आहे. तसेच ठाणे जिल्ह्यात एकूण ३३० लाभार्थ्यांना घरकुले बांधून देण्यात आलेली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

एमएमआरडीएची हद्द डहाणूपर्यंत वाढविण्याबाबत

(२९) ९४४८ (०६-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील बोईसर, डहाणू, पालघर या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकीकरण व औद्योगिकीकरण होत असून या भागातील जनतेत सध्या अस्तित्वात असलेल्या मूलभुत सोयी-सुविधा अत्यंत अपुऱ्या पडत आहेत, मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला सदरहू उपविभाग पर्याय ठरत असल्याने झपाट्याने वाढत असलेल्या लोकसंख्येला मूलभूत सोयीसुविधा अत्यंत कमी पडत असल्याने सदरहू उपविभाग मुंबई महानगर विकास प्राधिकरणांतर्गत समाविष्ट करण्यात यावा व एमएमआरडीएची हद्द डहाणू पर्यंत वाढविण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांकडे दिनांक ९ जुलै, २०१२, दिनांक २७ ऑगस्ट, २०१२ व तद्नंतर पुन्हा दिनांक ३० जानेवारी, २०१४ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :(१) व (२) होय. मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रादेशिक योजनेत सुधारणा करण्याची बाब मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर असून मुंबई महानगर प्रदेशाची हद्द वाढविण्याच्या गरजेबाबत प्रादेशिक योजनेत सुधारणा करतेवेळी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विचार करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विविध पदांबाबत

(३०) ९४५२ (०६-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता, बांधकाम, जलदाय अभियंता, श्रेणी “क”, कनिष्ठ अभियंता, मेकॅनिकल अभियंता, कनिष्ठ अभियंता स्ट्रक्चरल, कनिष्ठ अभियंता, नगररचना आदी विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास मंजूरी मिळावी याबाबतचा एक प्रस्ताव आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र क्र-वविशम/आस्था/८१५/२०११-१२ दिनांक २ मार्च, २०१२ अन्वये प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :(१), (२) व (३) वसई विरार शहर महानगरपालिकेने दिनांक २.३.२०१२ रोजीच्या पत्रान्वये अभियंत्यांची विविध संवर्गातील पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ९.९.२०१४ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारित आकृतीबंधास मंजूरी दिली असून त्यामध्ये बांधकाम, पाणीपुरवठा, नगररचना, विद्युत या विभागांसाठी शहर अभियंता, कनिष्ठ अभियंता या संवर्गातील आवश्यक ती पदे नव्याने मंजुरी केली आहेत.

ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर रोडच्या रुंदीकरणाबाबत

(३१) ९४५७ (०६-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर रोडच्या रुंदीकरणात विस्थापित झालेल्या कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकारच्या मालकीच्या तसेच एमएमआरडीएने चितळसर मानपाडा येथील आपल्या मालकीच्या ५५ हजार ४५१ चौ.मी. भूखंड ठाणे महापालिकेला दिल्यानंतर पालिकेने अन्य योजनांमधील विस्थापितांचेही पुनर्वसन या जागेवर केल्यामुळे एमएमआरडीएने जमिनीपोटी १२ कोटी ५५ लाख रुपये भरण्याचे आदेश ६ वर्षांपूर्वी देऊन आजतागायत ठाणे महापालिकेने भरले नसल्यामुळे जमिनीची मालकी आजही एमएमआरडीए कडेच आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार विकास प्रस्ताव पालिकेकडून मंजूर करुन घेताना तो जमीन मालकाने मांडावा लागतो किंवा किमान त्याची एनओसी तरी आवश्यक असते, मात्र ही मालकी एमएमआरडीए कडे असताना त्यांचे कोणतेही ना हरकत प्रमाणपत्र न घेताना पालिकेने स्वत:च इथल्या बीएसयूपी योजनाचा प्रस्ताव बेकायदा पध्दतीने मांडून स्वत:च मंजूर केले असून पालिकेने तब्बल ८० कोटी रुपये खर्च करुन इथे २१ इमारती उभारल्या असून काही इमारतीचे काम सुरु आहे व त्यासाठी आणखी काही कोटी रुपये खर्च पडणार असून आजही सदरहू बीएसयूपी योजनेची घरे रहिवाशांना मालकी हक्काने मिळालेली नाहीच व परिणामत: केंद्र सरकारच्या मूळ योजनेलाच त्यामुळे हरताळ फासला गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे पालिकेने बीएसयूपी योजनेअंतर्गत करोडो रुपये खर्च करुन उभारलेल्या इमारती प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (०२-०७-२०१५) :(१) अंशत: खरे आहे. सदर ठिकाणी बीएसयुपी योजना लागू झाल्यानंतर वेळोवेळी राज्य व केंद्र शासनाच्या आढावा बैठकीत सदर योजना नागरी गरीबांसाठी असल्याने सदर रक्कम माफ करण्यासंदर्भात चर्चा झाली असून त्याबाबत ठाणे महानगरपालिकेमार्फत एमएमआडीए कडे पाठपुरावा सुरु आहे.

(२) प्रस्तुत भुखंडाच्या मिळकतीचे हस्तांतरण ठाणे महानगरपालिकेकडे एमएमआरडीएमार्फत दि. १९.३.१९९९ व दि. १९.४.२००१ अन्वये करण्यत आलेले आहे. त्यास अधिन राहन विकास प्रस्तावानुसार हौसिंग फॉर डिसहाऊस अंतर्गत आरक्षित असलेल्या सदर भूखंडावर शहरी गरीबांसाठी बीएसयुपी योजना राबविण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

माणगाव (जि.रायगड) नांदवी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीचे उदघाटन होवून वर्ष झाले तरी विद्यार्थी अद्याप जुन्याच इमारतीत प्रशिक्षण घेत असल्याबाबत

(३२) ९४९६ (०९-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगाव (जि.रायगड) नांदवी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीचे उदघाटन होवून वर्ष उलटले तरी विद्यार्थी अद्याप जुन्याच इमारतीत प्रशिक्षण घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतीचे काम पूर्ण झाले असून केवळ किरकोळ कामे बाकी असून ती लवकरच पूर्ण होणार असून निविदा प्रस्तावात असलेली सर्व कामे पूर्ण झाली आहेत असे असतानाही प्राचार्य इमारतीचा ताबा घेण्यास तयार नसल्याने विद्यार्थ्यांना अद्याप जुन्याच इमारतीत प्रशिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :(१) होय.
(२) सदरहू इमारतीची पाहणी केली असता प्रशासकीय मान्यतेप्रमाणे संरक्षक भिंतीचे काम व काही अंतर्गत कामे अपूर्ण असल्याने इमारतीला केलेला पाणीपुरवठा पुरेसा नसल्याचे दिसून आले आहे. यास्तव प्रशिक्षणार्थ्यांची गैरसोय होवू नये म्हणून सा.बा. विभागाकडून कामे पूर्ण केल्यावर इमारतीचा ताबा घेण्यात येणार असल्याचे सा.बां. विभाग, महाड, जि.रायगड व सा.बां. उप विभाग, माणगांव, जि.रायगड यांना कळविण्यात आले आहे. सा.बां. विभागाद्वारे संस्थेची कामे पूर्ण झाल्यावर इमारतीचा ताबा घेण्यात येईल व नवीन जागेत संस्था स्थलांतरीत करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील प्रमुख यात्रा व पर्यटन स्थळांना
आवश्यक निधी उपलब्ध होत नसल्याबाबत

(३३) ९५०२ (०८-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील प्रमुख यात्रा व पर्यटन स्थळांच्या विविध सोईसुविधा आवश्यक निधी उपलब्ध होत नसल्यामुळे विकास झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जोड रस्ता, शौचालय, भक्त निवास, पार्किंगची सोय, रस्त्यावरील दिवाबत्ती अशा अनेक गोष्टींची कमरता निधी अभावी वंचित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सोई सुविधा पूर्ण होण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध होण्याबाबत शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :(१) व (२) हे खरे नाही.

(३) सन २०१४-१५ मध्ये जिल्हा वार्षि योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यासाठी यात्रास्थळांच्या विकासासाठी एकूण रु.१००.०० लक्ष एवढा निधी मंजूर असून सदर संपुर्ण निधी, विविध यात्रास्थळाच्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी विविधी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणाना वितरीत करण्यात आला आहे.

तसेच पर्यटन स्थळांच्या विकासासाठी रु.२१९.८८ लक्ष इतका निधी मंजूर असून, सदर संपूर्ण निधी पर्यटनस्थळांच्या विकासासाठी कार्यान्वयीन यंत्रणाना वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स लि.
या कंपनीच्या कामगारांना स्वेच्छानिवृत्ती घेण्यास भाग पाडल्याबाबत

(३४) ९५०४ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स लि.या कंपनीची सद्यःस्थिती पाहता या कंपनीचे अस्तित्वच नामशेष होण्याच्या मार्गावर असून मागील पाच वर्षापासून वाढती महागाई, कुटुंबाचा वाढता खर्च, आजारपणा आदी संकटाचा सामना करताना कामगार स्वेच्छानिवृत्ती घेण्यास उत्सुक असूनही पैसेच नसल्याने या कामगारांना त्यांच्या भविष्य निधीतूनही कर्ज देण्यात येत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (१५-०६-२०१५) :(१) मे. हिदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स लि.या आस्थापने संदर्भात समुचित शासन हे केंद्रशासन आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील पनवेल नगरपरिषद व रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या पोषण आहाराची नियमित देयके मिळत नसल्याबाबत

(३५) ९५०६ (०९-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील पनवेल नगरपरिषद व रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी सुरु करण्यात आलेल्या पोषण आहाराची देयके नियमित मिळत नसल्याने पोषण आहार योजना सुरळीत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमित देयके मिळत नसल्याने इंधन व पालेभाज्यांच्या खर्चासाठी पोषण आहार खर्च मुख्याध्यापकांना करावा लागत असून शासनाच्या असहकार्यामुळे सकस आहार योजनेचा लाभ मिळण्यास विद्यार्थ्यांना अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सकस आहार योजना सुरळीत सुरु राहण्यासाठी खर्चाची नियमित देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०७-२०१५) :(१) व (२) हे खरे नाही.
(३) शालेय पोषण आहार योजनेची माहे मार्च २०१५ पर्यंतची देयके शाळांना अदा करण्यात आलेली आहेत. सन २०१५-१६ मधील इंधन व भाजीपालासाठीचा माहे जुलै, २०१५ पर्यंतचा तसेच, स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंतच्या मानधनासाठीचा निधी जिल्हास्तरावर वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यात इंदिरा आवास योजनेचा निधी लाभार्थ्यांना वेळेवर उपलब्ध होत नसल्याबाबत

(३६) ९५२५ (०७-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात इंदिरा आवास योजनेचा निधी लाभार्थ्यांना वेळेवर उपलब्ध होत नसल्याने संबधित लाभार्थ्यांना त्यांचा आर्थिक भूर्दंड पडत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी संबधित लाभार्थ्यांना वेळेवर न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यांस जबाबदार असणा-याविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

रामटेक (जि.नागपूर) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे संस्कृत विद्यापीठ उभारण्याच्या प्रस्तावाबाबत

(३७) ९५२९ (०८-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथे कालिदास स्मारकाशेजारी आंतरराष्ट्रीय दर्जाचे संस्कृत विद्यापीठ उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय तसेच याकरिता निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदरचे विद्यापीठ उभारण्याकरिता किती कालावधी लागणे शासनास अपेक्षित आहे,

(४) उक्त संदर्भात निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०७-२०१५) :(१) रामटेक येथे कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय स्थापन केले आहे.

(२), (३) आणि (४) प्रश्न उद्भवत नाही.

म.रा.प.मंडळाच्या करमाळा जि.सोलापूर आगारातील अपु-या कर्मचारी संख्येबाबत

(३८) ९५४७ (०४-०४-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा आगार जि.सोलापूर येथे कार्यशाळा कर्मचारी (१८), चालक (१४) लिपिक व पर्यवेक्षक (१) अशी पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे वाहतुक व्यवस्था तसेच कार्यशाळा व्यवस्थापन यावर अतिरिक्त कामाचा ताण येऊन याचा परिणाम नागरिकांच्या दळणवळण सोयीवर होतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यावर कोणते उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१५) :(१) करमाळा आगारात कार्यशाळा कर्मचारी ८, चालक ३६, लिपीक ४ व पर्यवेक्षक २ इत्यादी पदे रिक्त आहेत.

(२) व (३) रा.प. सोलापूर विभागत सन २०१२ व २०१४ मध्ये सरळसेवा भरतीमध्ये सहाय्यक (कनिष्ठ) पदात निवड झालेल्या अतिरिक्त सूचीवरील ३२ उमेदवारांच्या नेमणूकीच्या अनुषंगाने वैद्यकिय तपासणी व सेवापूर्व प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे.

करमाळा आगारातर्फे ७४ नियते मंजूर असुन त्यासाठी ७७ वाहने उपलब्ध आहेत. तसेच १६१ चालक व १६२ वाहक मंजुर आहेत.

सद्यस्थितीत करमाळा आगारात १२५ चालक १४७ वाहक कार्यरत असून ६८ नियतांद्वारे प्रवासी वाहतूक सुरु आहे. नियोजनपूर्वक उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करुन दैनंदिन कामकाज व्यवस्था सुरळीतपणे पार पाडण्यात येते.

सोलापूर विभागासाठी ५०० चालकांची भरती करण्यासाठी जाहिरात देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

करमाळा (सोलापूर) पंचायम समितीमध्ये मग्रोरोहयो अंतर्गत ४७० विहिरींच्या मंजुरीतील त्रुटीमुळे लाभापासून वंचित विहिर धारकांबाबत

(३९) ९५५३ (०७-०४-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२-१३ मध्ये करमाळा पंचायत समितीकडून मग्रारोहयो अंतर्गत ४७० विहिरींना प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील सर्व विहिरींचे खोदकाम पूर्ण झाले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ४७० विहीरपैकी ९१ विहिरी पात्र तर ३७९ विहिरी अपात्र ठरविण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या कामात गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्याने कार्यकारी अधिकारी (जि.प.सोलापूर) यांनी चौकशीचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, दोषींची चौकशी होऊन त्यांचेवर कोणती कारवाई केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०१५) :(१) व (२) प्रशासकीय मान्यता दिलेल्या ४७० विहिरीपैकी २५० विहिरींची कामे सुरु करण्यात आली आहेत. त्यापैकी ५५ विहिरींची कामे पुर्ण झाली आहेत.

(३) व (४) हे खरे आहे.

(५) याप्रकरणी संबंधित तत्कालीन गट विकास अधिकारी यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच संबंधित लिपीक कम डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना बडतर्फ केले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

जेऊर (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील रेल्वे गेट सन २०१२ पासून बंद करण्यात आल्याबाबत

(४०) ९५५४ (१०-०४-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेऊर (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील रेल्वे गेट सन २०१२ पासून बंद करण्यात आले असून शहराचे दोन विभाग झाल्यामुळे तेथील नागरिकांना प्रवास करणे व दळण-वळण करणे गैरसोईचे होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थांनी वारंवार रेल्वे प्रशासन तसेच जिल्हाधिकारी यांचेकडे पर्यायी व्यवस्थेची मागणी केली असता शासनाने व रेल्वे विभागाने शहरापासून ३ किती अंतरावरून बाहयवळण रस्त्यावरून पर्यायी व्यवस्था असल्याचे सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामस्थांनी उच्च न्यायालयात याविरोधात जनहित याचिका दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार नागरिकांची होत असलेली गैरसोय टाळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (११-०६-२०१५) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) याबाबतची माहिती उपलब्ध नाही.

(४) व (५) जेऊर येथील रेल्वेगेटच्या ठिकाणी भुयारी मार्गाच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर काम रेल्वे विभागाची मंजूरी व निधी उपलब्धतेनुसार हाती घेऊन पूर्ण करण्याची नियोजन आहे.

सहायक निबंधक (सहकारी संस्था) कन्नड यांनी केलेला गैरव्यवहार

(४१) ९५६६ (२८-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहायक निबंधक (सहकारी संस्था) कन्नड यांनी गैरव्यवहार केल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत जिल्हा निबंधक यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनानुषंगाने सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२०-०७-२०१५) :(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पिशोर (ता.कन्नड) येथील हिराजी महाराज सहकारी कारखाना मर्या. या कारखान्यास शासकीय भागभांडवल व थक हमी मिळण्याबाबत

(४२) ९५६९ (२८-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिशोर (ता.कन्नड) येथील हिराजी महाराज सहकारी कारखाना मर्यादित पिशोर या कारखान्यास शासकीय भागभांडवल व थक हमी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ च्या पत्राद्वारे मा.सहकार मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार हिराजी महाराज सहकारी कारखाना मर्या. पिशोर या कारखान्यास शासकीय भागभांडवल व थक हमी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१०-०६-२०१५) :(१) पिशोर (ता.कन्नड) येथील हिराजी महाराज सहकारी कारखाना मर्यादीत पिशोर या कारखान्यास शासकीय भागभांडवल व थक हमी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१४ च्या पत्राद्वारे मा.सहकार मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(२) व (३) सदर कारखाना पाईपलाईन संवर्गातून वगळण्यात आला असल्याने शासन निर्णयानुसार कारखान्यास शासकीय भागभांडवल व कर्जास शासन थकहमी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

कन्नड शहरात जुन्या भागामध्ये नवीन महिला रूग्णालय वा शहरी प्राथमिक केंद्र उभे करण्यासंदर्भात

(४३) ९५७३ (०७-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड शहरात जुन्या भागामध्ये नवीन महिला रूग्णालय वा शहरी प्राथमिक केंद्र उभे करण्यासंदर्भात मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ च्या पत्राद्वारे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निवेदनावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१०-०७-२०१५) :(१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दि. ०५.०१.२०१५ च्या पत्राच्या अनुषंगाने कन्नड शहरात प्रसुती कक्षासह महिला रुग्णालय स्थापन करण्यासंदर्भात उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद याच्याकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या धोरणानुसार लोकसंख्येच्या निकषात बसत नसल्याने कन्नड नगरपरिषदेचा अंतर्भाव राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानात होत नसून तेथे शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करणे शक्य होणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कन्नड-सोयगांव मतदारसंघातील ग्रामीण रस्ते दुरूस्तीच्या प्रस्तावबाबत

(४४) ९५७६ (०७-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड-सोयगांव मतदारसंघातील ग्रामीण रस्ते दुरूस्तीचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद बांधकाम विभाग औरंगाबाद यांच्या मार्फत ग्रामविकास विभागस सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे का,

(२) असल्यास, सदर रस्ते दुरूस्तीच्या प्रस्तावाबाबात शासनाने काय कार्यवाही केली,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :(१) हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषद औरंगाबादने सादर केलेल्या प्रस्तावामधील रस्ते व पुल दुरुस्तीच्या १२ कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कुळ कायदा दुरूस्ती करून कुळाला मिळालेल्या जमिनी जुन्या शर्तीवर करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(४५) ९५९९ (०४-०४-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळ कायद्यामध्ये दुरूस्ती करून कुळांना मिळालेल्या जमिनी जुन्या शर्तीवर करण्याचा निर्णय घेतला व त्याची अंमलबजावणी करून ७/१२ च्या उता-यामध्ये दुरूस्ती करण्यासाठी शासनाने परिपत्रक काढून जिल्हा स्तरांवर आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याप्रमाणे सोलापूर जिल्हयामध्ये अशा १७ हजार एकर जमिनी १५ हजार ९ प्रकरणांपैकी किती प्रकरणामध्ये वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे,

(३) असल्यास, ही सर्व प्रकरणे किती दिवसात निकालात काढण्यात येणार आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१०-०७-२०१५) :(१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) सोलापूर जिल्हयामध्ये एकूण १२,४४९ प्रकरणापैकी १०,५५९ प्रकरणांमध्ये शेतकसाऱ्याच्या ४० पट रक्कम आकारुन गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्कातील नविन शर्तविषयक शेरा कमी करण्यात आला आहे. उर्वरीत १८९० प्रकरणांमध्ये न्यायप्रविष्ठ बाब. खातेदारांनी जनराण्याची ४० पट रकम जमा न करणे, अपूर्ण कागदपत्रे, अर्ज सादर न करणे, इत्यादी कारणांमुळे अधिकारी अभिलेखातील नविन शर्तविषयक शेरा कमी करण्यात आलेला नसुन, अशा प्रकरणी क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

राज्यामध्ये पैसेवारी काढण्याची सध्याची पध्दत बदलून खरीप व रब्बीचे दोन हंगामात पिकांची पैसेवारी काढण्याबाबत

(४६) ९६०० (०४-०४-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये खरीप व रब्बीचे दोन हंगाम असताना एकाच हंगामातील पिकाची पैसेवारी काढण्याची सध्याची पध्दत बदलून दोन्हीही हंगामातील पिकाची पैसेवारी काढण्याची पध्दत पुढील वर्षापासून करण्याचा शासनाच्या विचार जानेवारी, २०१५ मध्ये मा.महसूल मंत्री यांनी नाशिक येथे जाहीर केली आहे काय,

(२) असल्यास, सध्याची प्रचलित पध्दत बदलण्यासाठी शासनाने त्यासंबंधीचे तज्ञ अधिकारी अगर लोकप्रतिनिधी यांनी कमिटी नेमण्याचा विचार केला आहे काय,

(३) असल्यास, सध्याच्या प्रचलित पीक पैसेवारी पध्दतीत कोणकोणते दोष शासनाला आढळून आले आहेत व त्यावर काय कार्यवाही करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (०९-०७-२०१५) :(१) नाही, राज्यात सद्यस्थितीत खरीप व रब्बी या दोन्ही हंगामांची स्वतंत्र पैसेवारी काढण्यात येते.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक ०६ एप्रिल, २०१३ अन्वये प्रचलित पैसेवारी पध्दतीचा पुनर्विचार करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावरुन यथोचित निर्णय घेण्यात येईल.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियान २०१३-१४ अंतर्गत यांत्रिकीकरण २० एच.पी.ट्रॅक्टर या घटकाचे सोलापूर जिल्ह्यातील सांगोले तालुक्यातील लाभार्थ्यांना अनुदान न मिळालेबाबत

(४७) ९६०२ (०७-०४-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील सांगोले तालुक्यातील सन २०१३-१४ मध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत यांत्रिकीकरण २० एच.पी.ट्रॅक्टर या घटकास लकी ड्रॉ मार्फत दोन लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत लाभार्थ्यांना १०० टक्के रकमेने ट्रॅक्टर खरेदी करुनही अनुदान मिळाले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू लाभार्थ्यांना वरील योजनेचे अनुदान देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१०-०७-२०१५) :(१) अंशत: खरे आहे.
सांगोला तालुक्यातून लकी ड्रॉ मार्फत ५ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली होती.
(२) होय.
(३) व (४) शेतक-यांनी विहित कालावधीत तसेच परिपूर्ण प्रस्ताव सादर केले नसल्यामुळे अनुदान अदा करण्यात आले नाही.

भिवडी - निजामपूर पालिकेतील शिक्षकांची पगाराची थकबाकी असल्याबाबत

(४८) ९६११ (०७-०४-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू असतांनाच भिवंडी - निजामपूर पालिकेने मात्र शिक्षकांच्या १३ कोटी ३७ लाख रुपयांची पगाराची थकबाकी दिली नसल्याची धक्कादायक बाब दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी पालिकेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची थकबाकी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची थकबाकी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार ६ वा वेतन लागू करणेत आला आहे. उक्त शासन निर्णयानुसार सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे थकबाकीची रक्कम द्यावयाची झाल्यास महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली असणे व महानगरपालिकेस उत्तरदायित्वाची रक्कम वेळीच देणे शक्य होत असल्यासच सुधारित वेतन श्रेणीप्रमाणे थकबाकी दिली जाईल. तथापि, दिनांक २२.५.२०१३ पासून भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर प्रणाली महापालिकेस लागु झाल्यापासुन व्यापाऱ्याचा या कर प्रणालीस विरोध आहे. त्यामुळे त्यांचे वसुलीमध्ये सातत्याने चढ उतार होत असल्याने इतर महानगरपालिका प्रमाणे भिवंडी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समाधान कारक नाही. त्यामुळे सद्य स्थिती ६ व्या वेतन आयोगाची (मनपा ५० टक्के हिस्सा) फरकाची रक्कम देणे शक्य होत नाही. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समाधानकारक झाल्यावर ६ व्या वेतन आयोगाची फरकाची रक्कम अदा करण्यात येईल.

वरीलप्रमाणे व मनपा आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याने दि. १ ते ५ तारखेच्या आत नियमित वेतन वेळेवर देणे शक्य होत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

वरीलप्रमाणे व मनपा आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याने दि. १ ते ५ तारखेच्या आत नियमित वेतन वेळेवर देणे शक्य होत नाही.

मुंबईतील बी.के.सी.वांद्रे येथील विक्रीकर अधिका-यास लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाने अटक केल्याबाबत

(४९) ९६२४ (०७-०४-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बी.के.सी. वांद्रे येथील विक्रीकर अधिकारी कमलेश चौककर यांना सरकारमान्य कंट्री लिकर बारच्या व्यवसाय कराची थकबाकी कमी करुन देण्यासाठी ४० हजार रुपयांची लाच घेताना दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंध विभागाने अटक केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विक्रीकर अधिका-यांची विभागीय चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०७-२०१५) :(१) विक्रीकर विभागातील लोकसेवक श्री.कमलेश शरद चौककर, व्यवसायकर अधिकारी, मुंबई यांना दिनांक २१/१/२०१५ रोजी सापळा कारवाई दरम्यान फिर्यादीकडून रु.२०,०००/- लाच स्वीकारल्यानंतर रंगेहाथ पकडून ए.सी.बी., गु.र.क्र. ५/२०१५ कलम ७, १३ (१) (ड) सह १३(२) ला.प्र.कायदा, १९८८ अन्वये नोंदलेल्या गुन्ह्यात दिनांक २२/१/२०१५ रोजी २३.२० वाजता अटक करण्यात आली.

प्रस्तुत लाचस्वीकृती प्रकरणी श्री.कमलेश शरद चौककर, व्यवसायकर अधिकारी यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाल्यामुळे, त्यांना शासनाच्या दिनांक १३/३/२०१५ च्या आदेशान्वये आदेशाच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आले असून, अद्याप ते निलंबनाधीन आहेत.

(२) व (३) श्री.कमलेश शरद चौककर, व्यवसायकर अधिकारी (निलंबित) यांच्या कार्यभाराचे विशेष निरीक्षण घेण्यात आले असून, निरीक्षणात आढळलेल्या कामकाजातील त्रुटींच्या अनुषंगाने, तसेच इतर कार्यालयीन गैरशिस्तीच्या कारणास्तव त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याकरीता, संबंधित विक्रीकर सहआयुक्त व्यवसायकर, मुंबई यांचे कार्यालयाकडून विभागीय चौकशीचा प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुलींचे अपहरण करुन त्यांच्यावर बलात्कार केल्याचा नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविल्याबाबत

(५०) ९६२६ (०७-०४-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लहान मुलींचे अपहरण करुन त्यामुलींवर बलात्कार करुन नंतर त्यांना वेशाव्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या उरणचे वकील संजय भोईर व सहकारी किशोर ठाकूर यांच्याविरुध्द नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांनी या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, तद्नुसार आरोपींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१५) :(१) व (२) होय, सदर प्रकरणी फिर्यादीवरुन नेरुळ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१२/२०१३ भारतीय दंड विधान कलम ३६३, ३६६ (अ), ३६७, ३६८, ३७०(५), ३७३, ३४, १२०(ब) अन्वये दिनांक ४.११.२०१३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लहान मुलींवर बलात्कार झाल नसून त्यांचे अपहरण झाल्याप्रकरणी वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली असून न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.